NRB INDUSTRIAL

NIBL/BSE/NSE/19/2019-20

20th July, 2019

**National Stock Exchange Ltd.**
**Listing Department**
Exchange Plaza, 5th Floor,
G Block, Bandra-Kurla Complex
Bandra (East), Mumbai-400051
Fax No.:022-26598237/38

**BSE Limited**
**Listing Department**
Sir P.J. Tower, Dalal Street,
Mumbai-400001
Fax No. 022-22723121/3719/2037

**Ref. : BSE Scrip Code: 535458; NSE Symbol: NIBL**
**Sub. : Intimation of Publication of Results in Newspapers**

Dear Sir / Madam,

Pursuant to the Securities and Exchange Board of India (Listing Obligation and Disclosure Requirements) Regulations, 2015 ("Listing Regulations") this is to inform you that we have published the Notice of the 08th Annual General Meeting of NRB Industrial Bearings Limited to be held on Wednesday, August 14, 2019 at 11:00 a.m. at M.C. Ghia Hall, Dubash Marg, Mumbai 400 001, inter alia to transact the business stated in the Notice dated May 30, 2019 convening the AGM.

Please find enclosed herewith copy of Ad published in Financial Express & Mumbai Lashdeep.

Kindly take the above on record and acknowledge.
Thanking you,
Yours truly,

**For NRB Industrial Bearings Limited**

Ratika Gandhi
Company Secretary

N R B I N D U S T R I A L B E A R I N G S L T D.
REGD. OFFICE : 2ND FLOOR, DHANNUR, 15, SIR P.M. ROAD, FORT, MUMBAI - 400 001. MAHARASHTRA. INDIA.
TEL.: 9122 - 2270 4206 FAX : 9122 - 2270 4207
WEBSITE : http//www.nrbindustrialbearings.com
GSTIN : 27AADCN5657L1ZY
CIN : L29253MH2011PLC213963

इंदिरा समाजवाद ब्रँड अपयशी ६

कर्मक्षेत्रातून पलायनाचे नाव भक्ती नाही ६

दैनिक

# मुंबई लक्षदीप

Web : mlatnewspaper.in

आरएनआय नं. एमएएचएमएआर/२००१/०५४२६ पोस्ट क्र. एन डब्ल्यू/जी/आरएमपी/एमएनडब्ल्यू१९/२०१९-२१

मुंबई | वर्ष : १७ | अंक : ३२७ | पृष्ठे : ८ | शनिवार, दि. २० जुलै २०१९ | संपादक : डी. एन. शिंदे | किंमत २ रुपये

GRAND OFFER
PAY JUST 99,000/-
TO BUY A DREAM HOME
1 BHK FLAT STARTS
40 LACS +
FREE STAMP DUTY
LOAN UP-TO 95%*
*T&C Apply
PALAVA DOMBIVALI EAST
FREE PICK-UP & DROP
CALL: 9004444343

## गणेशोत्सवासाठी एसटी सज्ज




**मुंबई, दि.१९(हिंदुस्थान समाचार) : गणपती उत्सव म्हणजे कोकणच्या चाकरमान्यांचा अत्यंत जिव्हाळ्याचा सण आहे. किंबहुना एसटी, गणपती उत्सव व कोकणचा चाकरमानी यांचे एक अतूट नाते आहे. यंदा मुंबई व उपनगरातील चाकरमान्यांना त्यांच्या थेट कोकणातील घराच्या दारात सुखरूप सोडण्यासाठी एसटीने तब्बल २ हजार २०० जादा बसेसची सोय केली आहे. या सेवेचा त्यांनी लाभ घ्यावा असे आवाहन परिवहन मंत्री व एसटी महामंडळाचे अध्यक्ष दिवाकर रावते यांनी केले आहे.**

**यंदा लोकांची मागणी लक्षात घेऊन एसटी महामंडळाने २ हजार २०० बसेस मुंबईच्या गणपती उत्सवातील वाहतुकीसाठी उपलब्ध करून दिल्या आहेत. २८ ऑगस्ट ते २ सप्टेंबर या कालावधीत गणेश उत्सवाची पहिल्या टप्प्याची जादा वाहतूक करण्यात येणार असून, येत्या २७ जुलै (एक महिना अगोदर) पासून संगणकीय आरक्षणासाठी या जादा बसेस लावण्यात आल्या आहेत. विशेष म्हणजे, यावर्षीपासून चाकरमान्यांना परतीच्या प्रवासाचे देखील आरक्षण एकाचवेळी म्हणजे २७ जुलै पासून करता येणार आहे.**

### २० जुलै पासून ग्रुप बुकींगला सुरूवात..

गणपती उत्सवासाठी कोकणात आपल्या गावी जाण्यासाठी मुंबईतील चाकरमानी गटागटाने बस आरक्षित करतात. मुंबईतल्या विविध उपनगरातील लोक एकत्र येऊन कोकणातील एकाच गावी किंवा सलग असणाऱ्या गावात जाण्यासाठी एसटीची बस आरक्षित करतात, ही बस त्यांना सोयीची ठरते. गेली कित्येक वर्ष एसटी या चाकरमान्यांना त्यांच्या मुंबईतल्या घरापासून ते कोकणातील त्यांच्या वाडी वस्ती व गावापर्यंत सुखरूप आणि सुरक्षितपणे नेऊन सोडत आली आहे. अशा गट आरक्षणाला (ग्रुप बुकिंगला) २० जुलै पासून सुरुवात होत आहे संबंधित लोकांनी ग्रुप बुकिंगसाठी आपल्या जवळच्या आगारात संपर्क साधावा, असे आवाहन एसटी महामंडळातर्फे करण्यात येत आहे.

### १४ ठिकाणाहून जादा बसेस सुटणार..

२८ ऑगस्ट ते २ सप्टेंबर या पहिल्या टप्प्यात एसटीची वाहतूक सुरळीत होण्यासाठी मुंबई आणि उपनगरातील १४बसस्थानके व बसथांब्यावर एसटीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली कर्मचारी अहोरात्र कार्यरत राहणार आहेत. तसेच परतीच्या प्रवासासाठी म्हणजेच ७ सप्टेंबर ते १२ सप्टेंबर या कालावधीत कोकणातील स्थानिक बसस्थानकावरून जादा बसेसची सोय करण्यात आली आहे. कोकणातील महामार्गावर ठीक-ठिकाणी वाहन दुरुस्ती पथके (ब्रेक डाउन व्हॅन) तैनात करण्यात येणार असून प्रवाशांना प्रवासात तात्पुरत्या स्वरूपाची प्रसाधनगृहे उभारण्यात येणार आहेत.

## मुंबईतील पाणीकपात रद्द !



मुंबई, दि.१९ : मुंबईकरांसाठी खूशखबर असून पाणीकपात रद्द करण्यात आली आहे. पाणीकपात रद्द केली जावी यासाठी पालिकेवर राजकीय दबाव टाकला वाढू लागला होता. तसंच पाणीनगर विकास राज्यमंत्री योगेश सागर यांनी तलावांमधील पाणीसाठ्यात वाढ झाल्याने पाणी कपात रद्द केली जावी अशी मागणी केली होती. मुंबई शहर व उपनगराला पाणी पुरवठा करणाऱ्या तलावातील उपयुक्त साठ्यामध्ये आतापर्यंत सुमारे ५० टक्क्यापर्यंत वाढ झाली आहे. त्यामुळे बृहन्मुंबई महानगरपालिकेने गेल्या वर्षीपासून शहरात उपनगरामध्ये केलेली १० टक्के पाणी कपात तसेच पाणीपुरवठ्याच्या वेळेतील कपात रद्द करावी, अशी सूचना नगर विकास राज्यमंत्री योगेश सागर यांनी केली होती.

मुंबई शहर व उपनगराला पाणी पुरवठा करणाऱ्या तलावांमध्ये गेल्या वर्षी पाणीसाठा कमी झाला होता. त्यामुळे मुंबई महानगरपालिकेने पाणी पुरवठ्यामध्ये १० टक्के कपात केली होती. तसेच पाणी पुरवठ्याच्या वेळेतही १५ टक्के कपात केली. यंदा जून व जुलै महिन्यात पडलेल्या पावसामुळे तलावातील उपयुक्त जलसाठा साधारणपणे ५० टक्केपर्यंत झाला आहे. अद्याप सप्टेंबरपर्यंत सुमारे ५७ दिवस पावसाचे आहेत. या काळात समाधानकारक पाऊस पडल्यास पाणीसाठ्यात वाढ होईल. गेल्या वर्षी पाणी टंचाईमुळे महानगरपालिकेने पाणी पुरवठ्यात कपात केली होती. मुंबईतील विशेषतः उपनगरातील नागरिकांना या कपातीचा त्रास होत होता. यंदाच्या पुरेशा साठ्यामुळे महानगरपालिकेने केलेली ही कपात तातडीने रद्द करून पूर्वीप्रमाणे पाणीपुरवठा करावा आणि उपनगरातील नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणीही योगेश सागर यांनी यावेळी केली होती.

## नरेंद्र मोदी आहेत ‘आदर्श व्यक्तीमत्व’



नवी दिल्ली, दि.१९ : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मे महिन्यामध्ये सलग दुसऱ्यांदा पंतप्रधान पदाची शपथ घेतली. लोकसभा निवडणुकीमध्ये मोदींच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पार्टीला अभूतपूर्व यश मिळाले. २०१४प्रमाणे यंदाही मोदींचा करिश्मा पहायला मिळाला. मोदींची लोकप्रियता आजही कायम असल्याचे या निवडणुकीच्या निकालातून पहायला मिळाले. मात्र आता मोदींची ही लोकप्रियता केवळ भारतापुरती मर्यादित नसून शेजारी देश असणाऱ्या पाकिस्तानमध्येही लोक मोदींना आदर्श मानत असल्याचे एक सर्वेक्षणातून समोर आले आहे. ब्रिटनमधील योगोव्ह कंपनीने केलेल्या सर्वेक्षणामध्ये पाकिस्तानमधील जनतेच्या दृष्टीने आदर्श व्यक्ती कोण आहे याबद्दल मत जाणून घेत प्रभावशाली व्यक्तीमत्वांची यादी तयार केली. या यादीमध्ये भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचाही समावेश आहे.

मार्केट रिसर्च आणि डेटा ॲनलिसीस करणाऱ्या योगोव्ह कंपनीने जगभरातील जनतेकडून त्यांना आदर्श वाटणारी व्यक्ती कोणती यासंदर्भात मत जाणून घेतले. अमेरिका, युनायटेड किंगड्म, भारताबरोबरच पाकिस्तानमध्येही हे सर्वेक्षण घेण्यात आले. या सर्वेक्षणातून जागतिक स्तरावरील एक आणि देशांतर्गत एक अशा याद्या तयार करण्यात आल्या आहेत. जागतिक स्तरावरील यादीमध्ये मोदींना मागच्या वर्षीपेक्षा दोन स्थानांनी बढती मिळली आहे. मागच्या वर्षी या यादीत आठव्या क्रमांकावर असणारे मोदी यंदा सहाव्या क्रमांकावर आहेत. भारतामधील यादीत मोदी पहिल्या स्थानी असून दुसऱ्या स्थानी महेंद्रसिंह धोनी आहे. विशेष म्हणजे पाकिस्तानला धडा शिकवण्याचा प्रचार करुन निवडूण आलेल्या मोदींची लोकप्रियता पाकिस्तानमध्येही असल्याचे या सर्वेक्षणात दिसून आले.

## मॉब लिंचिंगचा कायदा कधी?

### औवेसींचा अमित शहांना सवाल




नवी दिल्ली, दि.१९ : खासदार असुदुद्दीन औवेसी यांनी संसदेत पुन्हा एकदा मॉब लिंचिंगच्या प्रश्नावरुन सरकारला धारेवर धरले आहे. गृहमंत्री अमित शहा यांना प्रश्न विचारताना, अद्याप मॉब लिंचिंगवर कायदा का केला नाही? मॉब लिंचिंगचा कायदा कधी अस्तित्वात येईल? असा प्रश्न असुदुद्दीन औवेसी यांनी लोकसभा सभागृहात विचारला. औवेसी यांनी अमित शहांना सर्वोच्च न्यायालयाचा दाखला देत, हा प्रश्न विचारला आहे.

लोकसभा सभागृहात राष्ट्रीय सुरक्षा सुधारणा विधेयकाच्या चर्चेवेळी खासदार असुदुद्दीन औवेसी आणि गृहमंत्री अमित शहा यांच्या खडाजंगी पाहायला मिळाली होती. दहशतवादाचा मुद्द येताच मुस्लीम समाजाल लक्ष्य करण्यात येत असल्याचा आरोप करत असुदुद्दीन औवेसी यांनी सत्यपालसिंह यांच्या भाषणाला विरोध केला होता. सत्यपालसिंह यांनी आपल्या भाषणात दहशतवादाचा मुद्दा उपस्थित करताना, हैदराबादेतून काही संशयितांना अटक करण्यात आल्याचे सांगितले. त्यावेळी, औवेसी यांनी आक्षेप घेत संसंदेत गदारोळ घातला. त्यानंतर अमित शहांनी औवेसींनी भरससंदेत खडसावले होते. औवेसीजी, तुम्हाला ऐकावंच लागेल. ते काय म्हणतायेत ते तरी ऐका, अशा शब्दात औवेसी यांनी असुदुद्दीन औवेसींना खडसावले होते. त्यानंतर, लोकसभा आणि राज्यसभा या दोन्ही सभागृहात म्हणजेच राष्ट्रीय सुरक्षा सुधारणा विधेयक मंजूर करण्यात आले.

एमआयएमचे खासदार असुदुद्दीन औवेसी यांनी सुधारणा विधेयकासह मॉब लिंचिंगचे विधेयकही का मंजूर केले जात नाही. मॉब लिंचिंगबाबत सरकार का कायदा करत नाही, असा प्रश्न उपस्थित केला.

मला गृहमंत्र्यांना हा प्रश्न विचारायला आवडेल की, आजपर्यंत मॉब लिंचिंगसंदर्भात कायदा का झाला नाही? गेल्यावर्षीच सर्वोच्च न्यायालयाने मॉब लिंचिंगच्या कायद्याबाबत विचारणा केली होती. जर, आपण सर्वोच्च न्यायालयाच्या सर्वच आदेशांचे पालन करता, मग या आदेशाचे का नाही? असे म्हणत औवेसी यांनी मॉब लिंचिंगच्या कायद्याची विचारणा केली आहे.

## सोनभद्र हत्याकांड: प्रियांका गांधींना यूपी पोलिसांनी घेतले ताब्यात



वाराणसी(उत्तर प्रदेश), दि.१९ : काँग्रेस महासचिव प्रियंका गांधींनी शुक्रवारी सोनभद्र हत्याकांडात जखमी झालेल्या लोकांची भेट घेतली. त्यानंतर त्या बाय रोड सोनभद्रकडे रवाना झाल्या, पण त्याआधीच पोलिसांनी त्यांच्या ताफ्लाया नारायणपूर(मिर्जापूर)मध्ये थांबवण्यात आले. त्यानंतर प्रियंका रस्त्यावरच धरणे आंदोलन केले. त्या म्हणाल्या की, मला फक्त चार जणांसोबतच पीडित कुटुंबाला भेटायचे आहे. मला थांबवणे आणि अटक करण्यासाठी पोलिसांना वरुण ऑर्डर देण्यात आली आहे. त्यानंतर पोलिसांनी प्रियंका आणि काही नेत्यांना सरकारी गाडीत बसवून गेस्ट हाउसमध्ये घेऊन गेले. पोलिस अधिकाऱ्यांनी सांगितले की, प्रियंका यांना अटक केलेली नाहीये. दरम्यान कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी सोनभद्रमध्ये कलम १४४ लागू केली आहे. येथील घोरावल परिसरात १७ जुलैला जमिनीच्या वादातून १० जणांची गोळी मारून हत्या झाली होती. यात पोलिसांनी मुख्य आरोपी सरपंच यज्ञदत्त भोर्तियासहित २७ जणांना अटक केली आहे.

### उत्तर प्रदेशमध्ये गुन्हेगार सुसाट


सोनभद्रला जाताना प्रियंकांच्या ताफ्याला वाराणसीजवळच थांबवण्यात आले. त्यानंतर त्या धरण्यावर बसल्या. प्रियंकांनी याआधी ट्रॉमा सेंटरमधून निघताना मीडियाशी बोलताना सांगितले होते की, उत्तर प्रदेशमध्ये कायदा सुव्यवस्था राखली जात नाही. येथील गुन्हेगार सुसाट आहेत, त्यांना सरकारची भीती राहिली नाही.

## मोबाईल गेमचा बळी

पुणे, दि.१९ : पुण्यात मोबाइल गेमच्या नादात एका तरुणाने आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. संतोष माळी असं या १९ वर्षीय तरुणाचं नाव आहे. कोरेगाव भीमा येथील पेरणे फाटा येथे ही धक्कादायक घटना घडली आहे. आत्महत्येपुर्वी संतोषने चिठ्ठी लिहून ठेवली होती. यामध्ये लिहिलेल्या मजकुरावरुन त्याने मोबाइल गेमच्या नादात आत्महत्या केल्याचं स्पष्ट होत आहे. दरम्यान पोलीस याप्रकरणी तपास करत आहेत. संतोष हा वाघोली येथील महाविद्यालयात वाणिज्य पदवीच्या दुसऱ्या वर्षात शिकत होता. आई-वडील आणि आजीसोबत तो राहत होता. त्याला मोबाइल गेमचं प्रचंड व्यसन होतं. कुटुंबीयांनी वारंवार सांगूनही त्याने मोबाइल गेम खेळणं सोडलं नव्हतं. गुरुवारी घरी एकटा असताना मोबाइलवर गेम खेळून झाल्यानंतर त्याने आत्महत्येचं पाऊल उचललं. दरम्यान संतोषने आत्महत्या करण्यापुर्वी चिठ्ठी लिहून ठेवली होती. यामध्ये त्याने अवर सन विल शाईन अगेन, पिंजऱ्यातील ब्लॅक पँथर मुक्त झाला आणि ‘द एंड’ असं लिहिलं आहे. सोशल मीडियावरील अकाऊंटवरही संतोषने मोबाइल गेममधील पात्र ब्लॅक पँथरचा फोटो ठेवला होता.

## पूरग्रस्त आसामसह ईशान्येत भूकंपाचे धक्के

**गुवाहाटी, दि.१९ :** आसामवर आधीच पुराचे संकट कोसळलेले असताना आसाम आणि अरुणाचल प्रदेशसह ईशान्येकडील राज्यांना आज भूकंपाचे धक्के बसले. रिश्टर स्केलवर ५.६ इतकी या भूकंपाची तीव्रता होती. अरुणाचल प्रदेशातील पूर्व कामेंग जिल्ह्यात भूकंपाचा केंद्रबिंदू होता. दरम्यान, भूकंपात कोणतीही जीवित वा वित्तहानी झाल्याचे वृत्त नाही.



आसाममधील जिल्ह्यांना पुराचा तडाखा बसला आहे. पुरामुळे आतापर्यंत जणांचा मृत्यू झाला असून तब्बल लाख लोकांना सुरक्षित स्थळी हलवावे लागले आहे. राज्यात आधीच पुरामुळे हाहाकार माजलेला असताना आज भूकंपाचे धक्के बसल्याने नागरिक आणखीच भयभीत झाले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, दुपारी २ वाजून ५२ मिनिटांनी आसाम, अरुणाचल प्रदेश, मेघालय, नागालँड आणि अन्य भागांना भूकंपाचे धक्के जाणवले. या भूकंपात कोणतीही जीवितहानी झालेली नाही, असे पोलिसांनी सांगितले.

## भाजपाचे कार्यकारी राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी. नड्डा आज मुंबईत



**मुंबई, दि.१९ (प्रमोद डोईफोडो) :** भारतीय जनता पार्टीचे कार्यकारी राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी. नड्डा हे आज शनिवारी मुंबई दौ-यावर येत असून, दादर येथिल वसंतस्मृती या भाजपा कार्यालय येथे प्रदेश पदाधिकारी आणि जिल्हाध्यक्षांच्या बैठकीत मार्गदर्शन करणार आहेत.

तत्पुर्वी सांताक्रुझ येथील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर भाजपा कार्यकर्त्यांतर्फे त्यांचे जोरदार स्वागत करण्यात येणार आहे. भाजपाच्या कार्यकारी राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी. नड्डा यांची नियुक्ती झाल्यानतर प्रथम ते मुंबई दौ-यावर येत असून, राज्यातील आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ते दादर येथिल वसंतस्मृती या भाजपा कार्यालय येथे प्रदेश पदाधिकारी आणि जिल्हाध्यक्षांच्या बैठकीत मार्गदर्शन करणार आहेत. सांताक्रुझ येथील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर भाजपा कार्यकर्त्यांतर्फे त्यांचे जोरदार स्वागत करण्यात येणार आहे.मुंबईत आगमन झाल्यानंतर ते विमानतळावरील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करणार आहेत.या निमित्ताने मुंबई भाजपकडून मोठे शक्तीप्रदर्शन केले जाणार आहे.

## कर्नाटकात पेच वाढला; मुख्यमंत्री सर्वोच्च न्यायालयात

**बेंगळुरू, दि.१९ : कर्नाटकातलं राजकीय नाट्य संपायचं नाव घेईना... राज्यपाल वजुभाई वाला यांनी मुख्यमंत्री कुमारस्वामी यांनी आज सायंकाळी वाजेपर्यंत बहुमत सिद्ध करायला सांगितले होते. पण आता या राजकीय नाट्याने वेगळेच वळण घेतले आहे. राज्यपाल विधानसभा अध्यक्षांच्या कामकाजात हस्तक्षेप करत असल्याची तक्रार घेऊन कुमारस्वामी यांनी थेट सर्वोच्च न्यायालयाचे दरवाजे ठोठावले आहेत.**

बहुमत सिद्ध करण्यासाठी राज्यपालांना पाठवलेल्या पत्रालाच कुमारस्वामी यांनी आक्षेप घेतला आहे. ‘राज्यपाल विधानसभा अध्यक्षांना त्यांच्या कामकाजाविषयी आदेश देऊ शकत नाहीत,’ असं कुमारस्वामी यांचं म्हणणं आहे. बहुमत सिद्ध करण्यासाठी राज्यपालांनी दिलेल्या अनेक डेडलाइन्सवरही त्यांनी प्रश्नचिन्ह उभे केले आहे. राज्यपालांनी विधानसभा अध्यक्षांना आदेश देणं हे सर्वोच्च न्यायालयाच्या आधीच्या निर्णयाच्या विरोधी आहे, असं कुमारस्वामी यांनी याचिकेत म्हटलं आहे. कर्नाटकच्या बंडखोर १५ आमदारांवर विधानसभेत उपस्थित राहण्यासाठी दबाव आणता येणार नाही, असं सर्वोच्च न्यायालयाने १७जुलै रोजी म्हटलं होतं. याचं स्पष्टीकरणही कुमारस्वामी यांनी न्यायालयाकडे मागितलं आहे.

NRB INDUSTRIAL

**एनआरबी इंडस्ट्रियल बेअरिंग्ज लिमिटेड**
सीआयएन : L29253MH2011PLC213963
नोंदणीकृत कार्यालय : २ रा मजला, धन्नूर, १५, सर पी.एम. रोड, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
दूर. : ०२२-६१२०७५००, फॅक्स : ०२२-२२७०४२०७
ई-मेल : investorcare@nibl.in वेबसाइट : www.nrbindustrialbearings.com

**८ वी वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना व ई-मतदानाची माहिती**

**सूचना** याद्वारे देण्यात येत आहे की सभासदांना त्यांच्या नोंदणीकृत पत्त्यांवर दि. १९.०७.२०१९ रोजी (पाठवणीच्या पूर्ततेची तारीख) पाठवण्यात आलेल्या सूचनेत विहित विषयांवर विचारविनिमय करण्यासाठी एनआरबी इंडस्ट्रियल बेअरिंग्ज लिमिटेडच्या सभासदांची **८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा** बुधवार, दि. १४.०८.२०१९ रोजी स. ११.०० वाजता एम. सी. घिया सभागृह, के. दुबाष मार्ग, मुंबई - ४०० ००१ येथे आयोजित करण्यात येत आहे.

कंपनी कायदा, २०१३ च्या अनुच्छेद ९१ अंतर्गत व सेबी (सूची अनिवार्यता व विमोचन आवश्यकता) विनियमन, २०१५ च्या विनियमन ४२ अंतर्गत पुढे **सूचना** देण्यात येत आहे की कंपनीचे सभासदांचे रजिस्टर व शेअर ट्रान्सफर बुक्स दि. ०३.०८.२०१९ ते दि. १४.०८.२०१९ दरम्यान (दोन्ही दिवस समाविष्ट) बंद राहतील.

कंपनी कायदा, २०१३ चे अनुच्छेद १०८ च्या तरतुदी सहवाचन कंपन्या (व्यवस्थापन व प्रशासन) नियम, २०१४ चे नियम २० सुधारित केल्यानुसार व सेबी (सूची अनिवार्यता व विमोचन आवश्यकता) विनियमन, २०१५ च्या विनियमन ४४ अंतर्गत पुढे सूचना देण्यात येत आहे की, कंपनी आपल्या सभासदांना सभेच्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्य ठिकाणाहून इलेक्ट्रॉनिक मतदान प्रणालीचा वापर करून मतदानाचा (“परोक्ष ई-मतदान”) हक्क बजावण्याची सुविधा उपलब्ध करून देत आहे. ई-मतदान सुविधा पुरविण्यासाठी एजन्सी म्हणून कंपनीने सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड (“सीडीएसएल”)ची सेवा नेमली आहे.

सभा आयोजित करणाऱ्या सूचनेच्या प्रतीसमवेत परोक्ष ई-मतदानाशी संबंधित पत्रव्यवहार सभासदांना पाठवण्यात आलेला आहे. सभेची सूचना कंपनीची वेबसाइट www.nrbindustrialbearings.com वर तसेच एनएसडीएलची वेबसाइट www.evotindindia.com वरही उपलब्ध आहे.

**परोक्ष ई-मतदान सुविधा दि. ११.०८.२०१९ रोजी स. ९.०० वा. (भा. प्र. वे.) सुरू होईल व दि. १३.०८.२०१९ रोजी सायं. ५.०० वा. (भा. प्र. वे.) संपेल. सदर तारीख व वेळेपश्चात परोक्ष ई-मतदानास परवानगी नसेल.**

**निर्धारित अंतिम तारीख अर्थात दि. ०२.०८.२०१९ रोजीनुसार सभासदांच्या/लाभार्थी मालकांच्या रजिस्टरमध्ये नावे असलेल्या व्यक्तीच केवळ परोक्ष ई-मतदान तसेच सभेमध्ये मतदानाची सुविधा प्राप्त करण्यास पात्र असतील.**

सभेच्या सूचनेच्यापाठवणीपश्चात एखादी व्यक्ती कंपनीची सभासद बनत असल्यास व निर्धारित अंतिम तारखेस अर्थात दि. ०२.०८.२०१९ रोजीनुसार भागधारक असल्यास सदर व्यक्ती investorcare@nibl.in येथे विनंती पाठवून युजर आयडी व पासवर्ड प्राप्त करू शकेल. युजर आयडी व पासवर्ड प्राप्त करण्याची विस्तृत प्रक्रिया कंपनीच्या वेबसाइटवर उपलब्ध असलेल्या सभेच्या सूचनेतही विहित आहे. सभासद आधीच सीडीएसएलकडे ई-मतदानाकरिता नोंदणीकृत असल्यास सदर भागधारक परोक्ष ई-मतदानाद्वारे मत देण्यासाठी विद्यमान युजर आयडी व पासवर्ड वापरू शकतो.

सभेच्या ठिकाणी ballot/polling.paper च्या माध्यमातून मतदानाची सुविधआ उपलब्ध करून देण्यात येईल व परोक्ष ई-मतदानाद्वारे मत न दिलेले सभेस उपस्थित राहणारे सभासद सभेमध्ये मतपत्रिकेद्वारे मत देऊ शकतील.

परोक्ष ई-मतदानाद्वारे मत दिलेले सभासद सभेस उपस्थित राहू शकतील, परंतु त्यांना पुन्हा मत देता येणार नाही.
इलेक्ट्रॉनिक साधनांद्वारे मतदानाशी संबंधित कोणत्याही शंका/तक्रारीकरिता सभासद/लाभार्थी मालकांनी खालील पत्त्यावर संपर्क साधावा :

**युनिव्हर्सल कॅपिटल सीक्युरिटीज प्रा. लि.**
(पूर्वीची मे. मोंडकर कॉम्प्युटर्स प्रा. लि. म्हणून ज्ञात)
२१, शकील निवास, महाकाली गुंफा मार्ग, अंधेरी (पूर्व), मुंबई - ४०० ०९३.
दूर. : ०२२-२८२० ७२०३-०५, ०२२-२८३६ ६६२०.
फॅक्स : ०२२-२८३६ ९७०४, ०२२-२८२० ७२०७.

**संचालक मंडळाच्या आदेशाद्वारे,**
**सही/-**
**रतिका गांधी**
**कंपनी सचिव व अनुपालन अधिकारी**

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : १९.०७.२०१९**